# Marathi

# 2012 March

# Arts, Commerce, Science 12th

# HSC

# Board Exam

# Maharashtra State Board

shaalaa.com

| 2012 | II | 23 | 1100 | J - 409 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# MARATHI (02)

Time : 3 Hrs. (6 Pages) Max. Marks : 80

प्र. १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा : [१०]

(१) यंत्रमानवाचे आगमन

(२) चांदण्यात फेरफटका

(३) वठलेल्या वृक्षाचे मनोगत

(४) मी शिक्षणमंत्री झालो तर ........

(५) स्वच्छता आणि पर्यावरण

प्र. २. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा : [८]

(१) यशवंतराव चव्हाण यांच्या मते युवकांपुढे कोणती आर्थिक आव्हाने आहेत?

(२) पृथ्वीभोवतीच्या अंतराळात वावरत असलेल्या तोतया यानाचा नाश कसा करण्यात आला?

(३) घरी आलेल्या मारेकऱ्यांचे मनपरिवर्तन महात्मा फुले यांनी कसे केले?

प्र. ३. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे ८० शब्दांत लिहा : [८]

(१) 'डुळकैलेया बाळकाचा दृष्टांत' या पाठातील मातेला सख्या-शेजारणींनी काय विचारले? का?

(२) 'कल्पद्रुमाची डहाळी' या पाठातील वाटाड्याने प्रवाशांना शेवटी कोणते रहस्य सांगितले?

(३) इटालियन माणसाच्या संगीतप्रेमाचे वर्णन लेखक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी कसे केले आहे?

(४) रजिया पटेल यांच्या कुटुंबात कशामुळे वादळ निर्माण झाले?



Visit www.shaalaa.com for more question papers.

**प्र. ४. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १२० शब्दांत लिहा :** [८]

(१) शाहीर राम जोशी यांनी कर्मकांड व ढोंगीपणावर कशी टीका केली आहे?

(२) 'आहे बुद्धीशी इमान' या कवितेत कवीने कोणती खंत व्यक्त केली आहे?

(३) लहान मुलांच्या वृत्तीतील निरागसपणा लोपत चालला आहे, असे कवी दासू वैद्य यांना का वाटते?

**प्र. ५. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ८० शब्दांत लिहा :** [४]

(१) ब्रह्मज्ञान आणि विवेक यांचे महत्त्व कवी मुकुंदराज यांनी कसे सांगितले आहे?

(२) स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सागराबद्दल कोणती तक्रार केली आहे?

(३) कवी दिलीप चित्रे यांना उलटे फिरल्यावर कोणता अनुभव आला?

**प्र. ६. (क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> गद्य वाक्यातील आशयसौंदर्य स्पष्ट करा :** (४) [१२]

(१) या दिवसामध्यें स्वामीनिराळें तुह्मीं रहावें ऐसें नाहीं.

(२) "आमची काळजी नगा करू. तुमीच जरा सावध ऱ्हावा म्हंजे झालं."

(३) सुपारीएवढ्या मण्यांची माळ तिची संस्कृती सांगते.

**(ख) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा :** (४)

(१) आत्मा अनुभवी पाहतां। देव दिसे हो तत्त्वतां ॥

(२) अलख निरंजन वाजविणारा
सहजपणात प्रवीण

(३) कुणी मुर्वत ठेवो न ठेवो
येथूनच आहे नव्या स्वप्नांची सुरुवात.

**(ग) (i) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा :** (२)

(१) 'सुगंध म्हणजे फुलांचा आत्मा' असे कोणी म्हटले आहे?

(२) तानूची आवडती सोबतीण कोण होती?

(३) छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक परिवर्तनाची प्रयोगशाळा कोठून सुरू केली?

(४) डॉ. नरेंद्र जाधव यांच्या आईचे नाव काय?



Visit www.shaalaa.com for more question papers

**(ii) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 'एका' वाक्यात लिहा : (२)**

(१) वैष्णवांनी आपला खेळ कोठे मांडला आहे?

(२) शैवांनी कोणाला भस्म फासले आहे?

(३) झाडांची-ओळख आकाशाशी केव्हा होते?

(४) परंपरेच्या कुंपणात काय अडकून पडेल, असे कवयित्री अनुराधा पाटील यांना वाटते?

**प्र. ७. (क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे १०० शब्दांत लिहा : (६) [१०]**

(१) 'कोणीकडून ............ कोणीकडे .......' या कथेतील पाटकरांच्या वागण्यामुळे कुटुंबाची वाताहत कशी झाली?

(२) 'सोन्याचा तुकडा' या कथेच्या लेखिकेने आपली भक्ती करणाऱ्या माणसाला कसे वागविले?

(३) 'तिची वाटच वेगळी' या कथेतील चंद्रकलेला पतीबरोबर कोणता संघर्ष करावा लागला? का?

**(ख) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर सुमारे ६० शब्दांत लिहा : (४)**

(१) 'त्याग' या कथेच्या नायिकेने झोपेचे सोंग घेऊन आपल्या आईदादांचे कोणते बोलणे ऐकले?

(२) 'ऊन' या कथेतील पिराजीची शिक्षणाची ओढ कोणत्या प्रसंगांमधून दिसून येते?

(३) 'स्पर्श' या कथेच्या नायिकेला भेटलेल्या बुवाची स्त्रीरूप आणि बाळरूप या बाबतींत कोणती मते होती?

**प्र. ८. (क) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण लिहा : (२) [१०]**

(१) श्लेष

(२) अतिशयोक्ती

**(ख) कंसांतील सूचनेनुसार कोणत्याही <u>दोन</u> वाक्यांचे रूपांतर करा : (२)**

(१) पावसाने जरा जोर धरून उघाडी दिली की पेरणीला सुरुवात होणार होती.
(वाक्यप्रकार ओळखा.)



Visit www.shaalaa.com for more question papers.

(२) जेव्हा झाडांचे शेंडे एकमेकांना भेटतात तेव्हा पालवीचा रंग बदलतो.
(संयुक्त वाक्य करा.)

(३) गार वाऱ्याची झुळूक उघड्या खिडकीतून आत आली आणि समईची वात थरथरली.
(केवल वाक्य करा.)

**(ग) खालीलपैकी कोणत्याही चार पारिभाषिक शब्दांचे अर्थ लिहा :** (२)

(१) Balance Sheet

(२) Decimal

(३) Headquarters

(४) Judgement

(५) Office Copy

(६) Tax-free

**(घ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार शुद्ध करून लिहा :** (२)

(१) प्रत्येक संस्कृतीत शीकण्यासारखं खुप आहे.

(२) तूमचा पुर्नजन्मावर विश्वास आहे का?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा :**

(१) पण वसंताच्या मिठीत मावेल एवढेच काही फुलांनी आपले अस्तित्व कोते ठेवलेले नाही बरे का

(२) "लक्ष्मी जरा मोट हुबी कर"

**(च) खालीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वतःच्या वाक्यांत उपयोग करा :** (२)

(१) देवाघरी निघून जाणे.

(२) पांग फेडणे.

(३) मनाचा भोवरा होणे.

(४) भरडून निघणे.



Visit www.shaalaa.com for more question papers.

प्र. ९. (क) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा : (४) [१०]

(१) तुम्हांला बुद्धिबळाचे सामने खेळण्यासाठी महाविद्यालयातर्फे परगावी जायचे आहे. त्या काळात वर्गात अनुपस्थित राहण्याची परवानगी मागणारे पत्र तुमच्या वर्गशिक्षकांस उद्देशून लिहा.

(२) तुमच्या महाविद्यालयातील बारावीच्या विद्यार्थ्यांना आकाशवाणी केंद्र पाहायचे आहे. या वर्गाचा प्रतिनिधी म्हणून परवानगी मागणारे पत्र आकाशवाणीच्या केंद्रसंचालकांना उद्देशून लिहा.

(ख) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : (३)

जीवन प्रवासात अनेक संकटे, संघर्ष हे अटळ असतात. आपल्या सर्वच इच्छा किंवा प्रेरणा फलद्रूप होणार नसतात. परिस्थिती नेहमी आपल्याला अनुकूलच राहील असेही नाही. प्रसंगी प्रवाहाविरुद्ध पोहणे आवश्यक असते. हे सारे लक्षात घेऊन जे अडचणींशी, समस्यांशी सामना करतात किंवा ज्या पद्धतीने परिस्थितीशी जुळवून घेतात त्यावर त्यांचे समायोजन आणि पर्यायाने जीवनातील यशस्विता अवलंबून असते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. कौटुंबिक आघात, आजार, अपघात, आपुलकीचा अभाव, कडक शिस्त, अतिलाड, सततची टीका इत्यादी घटक समायोजनाच्या समस्या उत्पन्न करण्यात आणि त्यांची तीव्रता वाढविण्यात हातभार लावत असतात.

डॉ. विजया फडणीस

(सुखाने जगण्यासाठी)

प्रश्न :

(१) जीवन प्रवासात कोणत्या गोष्टी अटळ असतात? (१)

(२) समायोजन व जीवनातील यशस्विता कशावर अवलंबून असते? (१)

(३) लेखिकेच्या मते समायोजनाच्या समस्या कशामुळे निर्माण होतात? (१)

**किंवा**

वरील गद्य उताऱ्याचा सुमारे एक तृतीयांश ($\frac{1}{3}$) एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.



Visit www.shaalaa.com for more question papers.

(ग) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर निमंत्रणपत्रिका तयार करा : (३)

(१) तुमच्या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या कथालेखन स्पर्धेचा पारितोषक वितरण सोहळा.

(२) तुमच्या महाविद्यालयातील सेवानिवृत्त होणाऱ्या प्राचार्यांचा निरोप समारंभ.

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर कार्यक्रमपत्रिका तयार करा :**

(१) तुमच्या महाविद्यालयातील चित्रकला प्रदर्शनाचे उद्घाटन.

(२) तुमच्या महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिकाचा प्रकाशन सोहळा.

**किंवा**

**खालील विषयावर वर्तमानपत्रासाठी वृत्तान्त लिहा :**

तुमच्या महाविद्यालयातर्फे 'साथीचे आजार' या विषयावर आयोजित केलेली व्याख्यानमाला.

◆◆◆



Visit www.shaalaa.com for more question papers.